माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : ३०/२०२२**

अपिलार्थी, श्री. नंदकिशोर वामनराव डोये

विरुध्द

**जन माहिती अधिकारी तथा उपप्रबंधक,**
उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रबंधक (प्रशासन),**
उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०५.०२.२०२४**

अपीलकर्ता : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०८.११.२०२१ | २२.११.२०२१ | २९.११.२०२१ | १४.१२.२०२१ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक ०८.११.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " Supply Xerox copy of five year Annual Confidential Report of Applicant during service period from २०१५-२०१६ to २०१९-२०२० at High Court Legal Service Sub-Committee, Nagpur. " इ. माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्ज जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२.११.२०२१ रोजी जन माहिती अधिकारी, उच्च न्यायालय विधी सेवा उपसमिती, नागपूर यांचेकडे कलम ६(३) नुसार हस्तांतरीत केला आहे. सदर प्राधिकरण न्यायीक अधिकारी प्रशिक्षण संस्थेच्या (जोती) आवारात असल्याने व अपिलार्थी श्री. डोयेहे स्वत: उच्च न्यायालय विधी सेवा उपसमिती चे जबाबदार अधिकारी असल्यामुळे वरील अर्ज कलम ६(३) नुसार हस्तांतरीत केला आहे. तद्नंतर अपिलार्थी यांनी **दिनांक २९.११.२०२१ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "माहिती प्रदान करण्यास जाणूनबुजून टाळाटाळ केली " असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून दिनांक १४.१२.२०२१ रोजी सविस्तर आदेश पारीत केले आहे. त्यात तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी Bombay High Court Right to Information (Revised) Rules, २००९ येथील नियम १५ प्रमाणे वरील प्रथम अपील देखील खारीज करण्यासारखे असल्याचे नमूद केले आहे. तसेच झालेले हस्तांतरण हे माहितीचा अधिकार

अधिनियम २००५ मधील कलम ६(३)(एक)(दोन) तसेच ७(१) व (३)(a) याप्रमाणे सुयोग्य असल्याचे जन माहिती अधिकारी यांचे प्रतिपादन लक्षात घेवून प्रस्तूत प्रथम अपील खारीज केलेला आहे.

त्यानंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक ०४.०१.२०२२ रोजी** " प्रथम अपिलीय आदेश अमान्य असल्याने " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दिनांक ०४.०१.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दिनांक ०५.०२.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी ऑनलाईन पध्दतीने सुनावणीस उपस्थित आहेत.

आज सुनावणी दरम्यान अपिलार्थी हे अनुपस्थित असून त्यांनी त्यांची बाजू प्रथम अपील अर्जात व व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली आहे. तसेच अपिलार्थी यांचा मुळ आक्षेप त्यांचा माहिती अर्ज विलंबाने उच्च न्यायालय विधी सेवा उपसमिती, नागपूर यांचेकडे कलम ६(३) नुसार हस्तांतरीत करण्याविषयी असून यात ९ दिवसाचा विलंब झाला असल्याचे नमूद केले आहे. तसेच उच्च न्यायालय विधी सेवा उपसमिती, नागपूर येथे अपिलार्थी हे स्वत: जबाबदार पदावर कार्यरत असल्याने मागितलेल्या माहितीबाबत कोठे माहिती अर्ज सादर करावा, याबाबत माहिती नसल्याचा प्रश्नच उद्भवत नसल्याचे प्राधिकरणाच्या वतीने नमूद करण्यात आले आहे. सदर बाब लक्षात घेता, अपिलार्थी हे स्वत: उच्च न्यायालयाच्या जबाबदार पदावर काम करीत आहे. त्यामुळे त्यांनी संबंधित विभागास माहिती अर्ज दाखल करणे अपेक्षित असतांना त्यांनी वरील माहिती अर्ज उच्च न्यायालयाचे जन माहिती अधिकारी यांचेकडे दाखल केला आहे व त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी कलम ६(३) नुसार योग्य त्या प्राधिकरणाकडे हस्तांतरीत केलेला असल्याचे आढळून येते. अपिलार्थी हे स्वत: त्या प्राधिकरणात काम करीत असतांना अशा प्रकारे उच्च न्यायालयातील ज माहिती अधिकारी यांनी केलेले हस्तांतरीत हे चुकीचे आहे असे म्हणणे योग्य होणार नाही. तसेच अपिलार्थी यांचा मुख्य आक्षेप माहिती मिळणे याबाबत नसून कलम ६(३) अन्वये झालेले हस्तांतरण याबाबत आहे. याबाबत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १४.१२.२०२१ रोजीच्या आदेशात योग्य ते भाष्य केलेले असून दाखल केलेला व्दितीय अपील अर्ज तथ्यहिन असून फेटाळण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील अर्ज फेटाळण्यात येत आहे.**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग
सत्यमेव जयते
★ नागपूर ★

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ०५.०२.२०२४**

जावक क्रमांक 5013 5113 ---------- दिनांक 14 Aug 2024 ----------------